Annexure XVI(6),(Vide Article-16.03.01)

शासकीय अधिकाऱ्यांचे/कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल लिहिणे व जतन करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक:सीएफआर-१२०६/प्र.क्र.५२/२००६/१३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक १० नोव्हेंबर, २००६

वाचा : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सीएफआर-१२९५/प्र.क्र.३६/९५/१३, दिनांक १ फेब्रुवारी, १९९६,
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:सीएफआर-१२०२/४०८/१३ दिनांक ४ सप्टेंबर, २००२

## परिपत्रक

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदन/पुनर्विलोकन करणे तसेच संस्करण व जतन याबाबत संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक १ फेब्रुवारी, १९९६ च्या शासन निर्णयाद्वारे सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे व त्यातील प्रतिकूल शेरे तसेच पदोन्नतच्या पात्रतेपर्यंत जे शेरे येत नाहीत असे शेरे संबंधितांना लेखी कळविणे इत्यादीकरिता कालावधी निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार अशी कार्यवाही प्रतिवर्षी दिनांक ३० जून च्या आत पूर्ण करणे आवश्यक करण्यात आले आहे. ही कार्यवाही विहित कालावधीतपूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित आस्थापना/संस्करण अधिकाऱ्यांवर सोपविली आहे. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच कार्यालयात/विभागांत दिनांक १.२.१९९६ च्य शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जात नाही. गोपनीय अहवाल विहित मुदतीत लिहिणे, त्यातील शेरे यथास्थिती संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना विहीत कालावधीत कळविणे इत्यादी बाबींचे पालन यथायोग्य होत नसल्यामुळे त्यांच्या पदोन्नतीस बाधा निर्माण होते. तसेच इतरही प्रशासकीय अडचणी निर्माण होतात असेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे संदर्भाधीन दिनांक १.२.१९९६ च्या शासन निर्णयातील सूचनांचा पुनरूच्चार करून त्यात नमूद गोपनीय अहवालाबाबतचे वेळापत्रक पुन्हा सर्वांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. दिनांक १.२.१९९६ च्या शासन निर्णयाद्वारे विहित केलेले वेळापत्रक सारांशाने खालीलप्रमाणे आहे.

### गोपनीय अहवाल लिहिण्याबाबतचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| (अ) स्वयंमूल्यनिर्धारण अहवालासह गोपनीय अहवाल प्रतिवेदन अधिकाऱ्याकडे | दिनांक ३१ मार्च नंतर लगेचच दिनांक १५ एप्रिलपर्यंत (सूचना क्रमांक २३) |
| (ब) प्रतिवेदन अधिकाऱ्यांनी परिशिष्ट "ब" भाग-४ लिहून पुनर्विलोकन अधिकाऱ्यांना सादर करणे. | दिनांक ३० एप्रिल पर्यंत (सूचना क्रमांक २४) |
| (क) पुनर्विलोकन अधिकाऱ्यांनी परिशिष्ट "ब" भाग-५ पूर्ण करून अहवाल संस्करण अधिका-यांकडे पाठविणे. | दिनांक १५ मे पर्यंत (सूचना क्रमांक २७) |
| (ड) संस्करण अधिकाऱ्याने सर्व गोपनीय अहवालांचे संस्करण करून त्यातील शेरे संबंधितांना कळविणे | दिनांक ३० जून पर्यंत (सूचना क्रमांक २८) |
| (इ) कळविलेल्या प्रतिकूल शेऱ्याविरूध्द अभिवेदन करणे. | शेरे कळविल्यापासून दोन महिन्यांत (सूचना क्रमांक ४२) |
| (फ) अभिवेदनावर प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिकाऱ्यांचे अभिप्राय प्राप्त करून शेरे काढणे/न काढणे याचा निर्णय घेण्याची कार्यवाही करणे. | अभिवेदन प्राप्त झाल्यापासून ०३ महिने (सूचना क्रमांक ४४) |

ROTA/H 1720 (3500-11-06)1

कृ.मा.प.

(ग) शेरे काढून टाकण्याची कार्यवाही पूर्ण करणे. | निर्णय झाल्यानंतर १५ दिवसांत (सूचना क्रमांक ४७)

सर्व मंत्रालयीन विभाग, नियुक्ती प्राधिकारी, विभाग/कार्यालय प्रमुख यांना या परिपत्राकाद्वारे निदेशित करण्यात येत आहे की, सदर आदेशांचे व गोपनीय अहवाल लिहिणे/संस्करण करण्यासंबंधीच्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची सर्व संबंधितांनी नोद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

प्रकाश लोखंडे
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री/राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
* प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय (विधानपरिषद), मुंबई,
* राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई,
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती
* पत्राने

H 1720-1 31